इसारा रक्कम रु.९७८०/-

वसई विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती एच
नवघर माणिकपुर

# जाहिर दरपत्रक

याव्दारे पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापान अधिनियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणे कामी २४० लिटर क्षमतेच्या HDPE कचरा कुंडी (DUST BIN) पूरवठा करण्याकामी इच्छुक व्यक्ती, संस्था व पुरवठादार यांचेकडून दि.२३/१२/२०२२ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत बंद पाकिटातून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | कचरा कुंडी | संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | हिरवा | १५० | | |
| २ | निळा | १५० | | |
| | एकुण | ३०० | | |

**<u>अटी-शर्ती</u>**

१. पुरवठादाराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर वस्तु व सेवाकर नोंदणी (GST) क्रमांक असणे बंधाकारक राहिल.
२. मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड व आधारकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.
३. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती एच कार्यालय आवक जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहिल.
४. दरपत्रकदारांनी जाहिर निविदा सुचानेमध्ये नमुद केलेली इसारा अनामत रक्कम डिमांड ड्राफ्ट स्वरुपात दरपत्रक सादर करतेवेळी जमा करावयाचा आहे अन्यथा आपले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
५. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून अंदाजित खर्चाच्या ३% सुरक्षा अनामत रक्कम डिमांड ड्राफ्ट मार्फत भरणा करुन ७ दिवसांत करारानामा करावयाचा आहे. मुदतीत करारानामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
६. दरपत्रकात नमुद वस्तुंचे / साहित्यांचे दर हे सादर करताना वाहतूक खर्च तसेच सर्व करांसहित सादर करण्यांत यावे.
७. पुरवठा करण्यात येणाऱ्या २४० लिटर क्षमतेच्या HDPE कचराकुंडी ही BSEN – 840 - 1 स्टॅन्डर्ट प्रमाणित असावे व त्या संबधित सर्व आवश्यक चाचणी अहवाल तसेच प्रमाण्पत्र सोबत जोडण्यात यावे.
८. पुरवठादाराने २४० लिटर क्षमतेच्या HDPE कचराकुंडी या व्हिल लिड तसेच टॉईंग प्रोविजन सोबत पुरवठा करणे बंधनकारक आहे.
९. कार्यादेश दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत कचराकुंडी पुरवठा करणे बंधनकारक राहील अन्यथा प्रति दिन १०० रु. दंड आकारण्यात येईल.

१०.आपण पुरविलेल्या कचराकुंडी ६ महिन्याच्या आत पुन्हा खराब झाल्यास आपणांस सदर कचराकुंडी विनामोबदला बदलून द्यावे लागेल.

११. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. उपायुक्त यांचा राहिल.

१२. वरील अटींचे पालन जो पुरवठादार करणार नाही त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.

१३. यासंबधी दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दिनांक २३/१२/२०२२ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती कार्यालय, नवघर माणिकपुर येथे सादर करावी.

१४. दिलेल्या दरपत्रकामधील प्राप्त दरा व्यतिरिक्त इतर कोणत्याही अतिरिक्त देयकाची मागणी पुरवठादारास करता येणार नाही.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २३/१२/२०२२ रोजी संध्या. ४.०० वाजता मा. उप-आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकावर अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**स्थळ:-** प्रभाग समिती एच कार्यालय, नवघर माणिकपुर

**जा .क्र.** ५७५२/२०२२/२३

**दिनांक :-** १९/ १२/२०२२

19/12/22

(तानाजी नरळे)

उप-आयुक्त

प्रभाग समिती एच

वसई विरार शहर महानगरपालिका